महाराष्ट्र पोलीस
सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 23/06/2023 (शुक्रवार) दुपार

### चोरी

**१) पो.स्टे. पारशिवनी** :— अंतर्गत ०१ किमी अंतरावर दिगलवाडी रोड सरोजनी स्कुलच्या मागे पारशिवनी येथे दिनांक २०/०६/२०२३ चे १९.३० वा. ते २१/०६/२०२३ चे ०९.०० वा. सुमारास फिर्यादी नामे— पुसाराम चांगोजी रेवतकर, वय ४८ वर्ष, रा. प्रभाग क्र. १७ पारशिवनी यांचे घराचे बांधकाम सुरू असुन फिर्यादीने बांधकाम करण्याकरीता झोपडीचे बाहेर खुल्या आवारात ठेवलेले बांधकाम साहीत्य १) लोखंडी रॉडचे तुकडे अंदाजे वजनी ३० किलो, अंदाजे किंमती १८००/— रू २) तयार केलेल्या ३० लोखंडी रिंगा अंदाजे किंमती १८००/—रू. ३) बांधकाम साहीत्याचे २ लोखंडी घमेले अंदाजे किंमती १८०/— रू. ४) एक प्लास्टीकचे घमेले अंदाजे किंमती ८०/— रू ५) एक फावडा इत्यादी साहीत्य अंदाजे १५०/— रू असा एकुण ४०१०/— रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. पारशिवनी येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार उके, मो. नं. ९८८१२४१०८९ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. कळमेश्वर** :— अंतर्गत २३ किमी अंतरावर मौजा लोहगड शिवार येथे दिनांक २१/०६/२०२३ चे रात्री दरम्यान फिर्यादी नामे— संजय अन्नाजी गहाने, वय ५४ वर्ष रा. मरीया वि. वि. केंद्र झिल्पा हे मरिया विद्युत केंद्र झिल्पा याचे मालक असुन दिनांक २१/०६/२०२३ रोजी रात्री दरम्यान कोणीतरी अज्ञात ईसमाने विद्युतपोल तोडल्यामुळे, विजमुद्रन केंद्र झिल्पा कार्यक्षेत्र अंतर्गत मौजा लोहगड शिवारातील विद्युत लाइनचे १० पोल वरिल तार चोरी गेल्याची माहिती भ्रमणध्वनी वरून लोहगड येथील विज कंपनीचे बाहय स्त्रोत तंत्रज्ञ श्री. नितेश भास्कर यांनी दिली त्यानुसार स्थळ पाहणी केली असता मोहपा रोड वरील भास्कर डिटीसी क्र. ४५६१४६२ हा टान्सफार्मरचा विद्युत पुरवठा जोडलेला शेती पंपा कडील विद्युत पोल वरिल ३ फेसच्या वायरचे १० स्पन मधील अंदाजे ८२०० फुट एल्युमीनीयम तार चोरी झाल्याचे आढळले तसेच ३ पोल सिमेंट तुटुन खाली पडलेले व लाईनचा एक उभा पोल तुटलेल्या स्थीतीत आढळला त्यामुळे विज कंपनीचे ५२९२०/—रू. किंमतीचे एल्युमीनीयम कोणीतरी अज्ञात चोराने चोरून व तोडुन नुकसान केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कळमेश्वर येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९, ४२७ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार भुक्ते मो. क्र. ९८२३६१२८५८ हे करीत आहे.

# विनयभंग

**पो.स्टे. भिवापूर :–** दिनांक २१/०६/२०२३ चे १०.४५ वा. दरम्यान फियार्दी ही आपल्या घराचे स्लॅबवर झोपली असता फिर्यादीचे घराचे समोर राहणारा **आरोपी नामे– मिलींद नानाजी डडमल, वय २५ वर्ष, रा. खोलदोडा ता. भिवापुर जि. नागपुर** हा फिर्यादीचे स्लॅबवर येवुन फिर्यादीचे पोटावर बसुन तोंड दाबुन व दोन्ही हात पकडुन फिर्यादीचा विनयभंग केला. कोणाला काही सांगीतले किंवा ओरडली तर तुला खाली फेकुन देईन अशी धमकी दिली. तेव्हा फिर्यादी ही ओरडली असता तेवढयात फिर्यादीचे पती हे घराचे छतावर आले तेव्हा आरोपी हा पळुन जात असता फिर्यादीचे पतीने त्याचा हात पकडला असता आरोपी हा झटका मारून पळून गेला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. भिवापूर येथे आरोपीविरुध्द कलम ३५४, ५०६ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार अशोकसिंग ठाकूर मो. नं. ९८२२६४३७७९ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर